प्रेसनोट दिनांक – ११/०७/२०१८

---

**अत्यंत क्लिष्ट खुनाच्या गुन्हयातील आरोपीस जेरबंद केल्याबददल खडक पोलीसांचा सत्कार**

---

मा. रश्मि शुक्ला पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी दिनांक – ११/०७/२०१८ रोजी गुन्हे विषयक मासिक बैठकीमध्ये खडक पोलीस स्टेशन पुणे येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी अत्यंत क्लिष्ट खुनाच्या गुन्हयातील आरोपीचा शोध लावल्याबददल सर्वांचे कौतुक करुन प्रशस्तिपत्रक व तीस हजार रुपये बक्षिस देवुन सत्कार केला आहे.

दिं - ०४/०६/२०१८ रोजी सकाळी - ०६:०० वा. पूर्वी मुंबई फुड मॉल ५०२ घोरपडे पेठ, शिवाजी रोड, स्वारगेट, पुणे या ठिकाणी कचरु गणपत गवळी वय–३२ रा–बिबवेवाडी पुणे याचा अज्ञात आरोपीने चाकुने वार करुन खुन केला होता. **खुनाची घटना मध्यरात्री साडेतीन वाजण्याचे सुमारास घडलेली असल्याने कोणीही साक्षीदार उपलब्ध नव्हते व कोणत्याही प्रकारे धागेदोरे मिळुन येत नव्हते व सुगावा लागत नव्हता त्यामुळे आरोपीचा शोध घेण्याचे मोठे आव्हान पोलीसांसमोर निर्माण झाले होते. पोलीसांनी आपली उमेद न सोडता सतत बावीस दिवस अहोरात्र मेहनत घेवुन अथक परिश्रम करुन बारकाईने व कसोशिने तपास चालु ठेवला होता.** आरोपीचा शोध घेण्याकामी पोलीसांची चार पथके करण्यात आलेली होती. संशयीत इसम व मयत कोठे कोठे एकत्र आले याबाबत माहीती घेण्यासाठी पुणे शहरातील बुधवार पेठ, शुक्रवार पेठ, शिवाजी रोड, स्वारगेट, सातारा रोड, बिबवेवाडी रोड, कात्रज रोड या परिसरातील सरकारी व खाजगी असे सुमारे ऐंशी सीसीटिव्हि फुटेजची पाहणी करण्यात आली होती. त्यामध्ये संशयीत आरोपी पांढरे व काळे रंगाचे होंडा डिओ स्कुटरवरुन फिरत असल्याचे व त्याचा व मयतामध्ये एकेठिकाणी वाद झाल्याचे दिसुन आले होते.

पुणे शहर व जिल्हयातील होंडा डिओ कंपनीच्या सर्व डिलर कडुन अंदाजे दोन हजार गाडयांची माहीती संकलीत केली होती व तांत्रिक मुदयावर सखोल तपास करण्यात आला होता. त्यामधील निवडक संशयीत पांढरे व काळे रंगाचे एकशे सोळा डिओ मोपेडचे मालकांना बोलावुन त्यांचेकडे सखोल तपास करण्यात आला त्या तपासामध्ये संशयीत इसमाबाबत माहीती प्राप्त झाली होती. त्यानुसार दिं – २५/०६/२०१८ रोजी संशयीत इसम अश्विन विकास गवळी वय – १९ रा – प्लॅट नं १२ विघ्नहर्ताकुंज बिल्डिंग विघ्नहर्ता नगर आंबेगाव पठार कात्रज पुणे - ४६ यास पकडण्यात आले आहे त्याचेकडे तपास केला असता मयत इसमाने आरोपीच्या डोक्यात बाटली मारल्याने त्याचा राग मनात ठेवुन त्याचे छातीवर चाकुने वार केल्याचे सांगीतले आहे.

खडक पोलीस स्टेशन कडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी अहोरात्र मेहनत घेवुन अथक परिश्रम करुन अत्यंत क्लिष्ट खुनाच्या गुन्हयातील आरोपीस पकडुन सदर गुन्हा उघडकीस आणल्याबददल परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री. बसवराज तेली यांनी त्यांना बक्षिस मिळण्याबाबत पोलीस आयुकत पुणे शहर यांचेकडे शिफारस केली होती. त्यानुसार मा. रश्मी शुक्ला पोलीस आयुक्त पुणे यांनी खडक पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोकाशी पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री संभाजी शिर्के व तपास पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक उमाजी राठोड, पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड, आनंत व्यवहारे व तपास पथकातील कर्मचारी सतिश नागुल, विनोद जाधव, बापु शिंदे, विश्वनाथ शिंदे, संदिप कांबळे, अशिष चव्हाण, अनिकेत बाबर, समीर माळवदकर, विनोद जाधव, इम्रान नदाफ, रविंद्र लोखंडे, गणेश सातपुते, सागर घाडगे, महेश कांबळे, तानाजी सरडे, राहुल जोशी, यांचे कौतुक करुन प्रशस्तिपत्रक व तीस हजार रुपये बक्षिस देवुन सर्वांचा सत्कार केला आहे.